**MHKO100002632022**

## <u>आदेश निशाणी क्र. १७</u>

प्रतिवादी क्र. १ यांनी सदरचा अर्ज त्यांचे विरुध्द झालेला "विना कैफीयत" आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र. १ यांचा अर्ज व वादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजूचे विधीज्ञ यांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणे युक्तीवाद केला आहे.

३. प्रतिवादी क्र. १ यांचे असे कथन आहे की, प्रतिवादी यांनी कैफीयत देणेस जाणुनबुजून टाळाटाळ केलेली नाही. प्रतिवादी यांना दावेतील आवश्यक ते कागदपत्रे वेळेत प्राप्त करुन घेणे अडचणीचे झालेने मुदतीत कैफीयत दाखल करणे शक्य झाले नाही. सदरचा दावा हा स्थावर मिळकतीबाबतचा असल्याने न्यायाचे कारणास्तव प्रतिवादी यांना कैफीयत दाखल करणेस झालेला विलंब माफ होणे गरजेचे आहे. सबब सदरचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. वादी यांनी सदरचे अर्जास आपले म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रतिवादी यांचे अर्जातील सर्व मजकुर चुकीचा व खोटा आहे. अर्जात कथन केलेप्रमाणे कोणताही कागदोपत्री पुरावा हजर केला नाही. अर्ज नामंजूर करणेत यावा व जर मंजूर करावयाचा झालेस रुपये २०००/- खर्च प्रतिवादीवर बसविणेत यावा अशी विनंती केली आहे.

५. वादी यांनी सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द अतिक्रमण क्षेत्राचा कब्जा काढून मिळणेकरीता दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी सदरचा अर्ज शपथेवर दाखल केला आहे. कैफीयतीच्या स्वरुपात म्हणणे मांडण्याची संधी प्रतिवादीस देणे हे नैसर्गिक न्याय तत्वाच्या दृष्टीने गरजेचे आहे तसे न झाल्यास निश्चितपणे नैसर्गिक न्याय तत्वाचे उल्लंघन होईल. दाव्याचा गुणदोषावर निकाल करणेसाठी प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर येणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी यांची कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेतल्यामुळे वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट दाव्याचा अंतिम न्यायनिर्णय करणेसाठी मदत होणार आहे.

६. उभय पक्षांचे कथन पाहता या ठिकाणी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे (नागपूर बेंच) मधील ***<u>Municipal Council, Hinganghat, Dist. Wardha V/s.</u>***

***Sudhirkumar Krushnakumar Sahani reported in 2010(3) Mah. L.J. Page No. 948 Bom. H.C. (Nagpur Bench)*** या न्यायनिर्णयाचा आधार घेत आहे. सदर न्यायनिर्णयामध्ये "*Outer after limit for filing written statement is 90 days from the date of service of summons but where sufficient ground and reasons are shown the application though filed belatedly and casually, deserves to be allowed.*" असे अभिमत व्यक्त करण्यात आलेले आहे. प्रतिवादी यांनी आपली कैफीयत दाखल करणेस उशीर केला हे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी केलेल्या उशीराबाबत त्यांचेवर खर्च बसवून सदरचा अर्ज मंजूर करणे न्यायोचीत वाटते. सबब खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आ दे श

**१)** प्रतिवादी क्र. १ यांचा निशाणी क्र. १७ वरील अर्ज वादी यांना खर्चादाखल रक्कम **रुपये २००/- (अक्षरी रुपये दोनशे मात्र)** देणेच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**२)** प्रतिवादी क्र. १ यांनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर प्रतिवादी यांची प्रस्तुत अर्जासोबत दिलेली कैफीयत अभिलेखावर दाखल करुन घेणेत यावी.

(खुल्या न्यायालयात न्यायनिर्णय घोषित करण्यात आला)

Digitally signed by Maheshkumar Tanajirao Kharade
Date: 2023.03.23 14:48:43 +0530

**ठिकाण – गडहिंग्लज**
**दिनांक २३/०३/२०२३**

**(म. ता. खराडे)**
**सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.**
**गडहिंग्लज**